बीड । महाराष्ट्र
गुरूवार दि.२६/२/२०२६
वर्ष ५ वे । अंक ३२६
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com











## राज्यातील ११ हजार सहकारी संस्थांच्या

# निवडणुकीचा बिगुल वाजला




- राज्यातील ११,०४१ सहकारी संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा.
- उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रक्रिया पुन्हा सुरू.
- अ आणि ब वर्गातील संस्थांची निवडणूक थांबलेल्या टप्प्यापासून पुढे.

**मुंबई** । वृत्तसेवा

राज्यातील महापालिका, झेडपीनंतर आता सहकारी संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजला आहे. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्थगिती देण्यात आलेल्या सहकारी संस्था वगळून अन्य सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया ज्या टप्प्यावर थांबल्या होत्या त्या तेथून पुढे ढकलण्यात आल्या होत्या. त्या टप्प्यापासून सुरू कराव्यात, असे आदेश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे यांनी दिलेत. त्यामुळे राज्यातील सुमारे ११ हजार ४१ सहकारी संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झालाय. अ, ब वर्गातील संस्थांचा निवडणूक प्रक्रिया थांबलेल्या टप्प्यापासून सुरू झाली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार राज्यातील नगरपालिका व नगर पंचायतीच्या निवडणुका तसेच जिल्हा परिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या ▶▶ पान २ वर

## हैदराबाद गॅझेट लागूनही कुणबी प्रमाणपत्राचा तिढा सुटेना

# जरांगे पाटील पुन्हा मैदानात!

**जालना** । प्रतिनिधी



मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत झालेल्या आंदोलनाला मोठे यश मिळाले होते. राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटमधील नोंदींचा आधार घेत कुणबी प्रमाणपत्र वाटपाचा अध्यादेश काढला होता. या निर्णयानंतर मनोज जरांगे पाटील यांच्यासह मराठा समाजाने आनंदोत्सव साजरा केला. परंतु हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या निर्णयानंतरही कुणबी प्रमाणपत्र दिले जात नसल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत. आतापर्यंत केवळ ७०० जणांना कुणबी प्रमाणपत्र वितरित करण्यात आल्याची आकडेवारी समोर आली आहे. यावरून मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. मराठा समाजाने सरकारला आतापर्यंत भरपूर वेळ दिला अजूनही तीन महिन्यांचा वेळ देतो. जूनपर्यंत मराठा समाजातील नोंदी सापडलेल्या प्रत्येकाला कुणबी प्रमाणपत्र मिळाले नाही तर मात्र मला पुन्हा उपोषणाला बसावे लागेल. मग हे आंदोलन मुंबई धडकले तर त्याला सरकार जबाबदार असेल, ▶▶ पान २ वर

## ग्रामीण भागात

# ५ लाख ३९ हजार एकल महिला

**छ.संभाजीनगर** । वृत्तसेवा

मराठवाडा विभागात एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विशेष उपक्रम सुरू केला आहे. विभागातील एकल महिलांची अचूक संख्या निश्चित करण्यासाठी सर्व आठ जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्वेक्षणात ४ लाख ९३ हजार ४५० एकल महिला आढळून आल्या आहेत. नागरी भागातील एकल महिलांचे सविस्तर सर्वेक्षण करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या सक्षमीकरण कार्यक्रमासाठी विभागीय महिला व बाल विकास उपायुक्त यांची विभागीय नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती ▶▶ पान २ वर

## स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी कायद्यासोबतच सामाजिक क्रांतीची गरज

# विधिमंडळात आ.मुंदडा यांची अभ्यासपूर्ण मांडणी



**मुंबई** । वृत्तसेवा

स्त्री भ्रूणहत्या हा केवळ कायद्याचा विषय नसून तो समाजाच्या मानसिकतेचा प्रश्न आहे, असे ठाम प्रतिपादन आमदार नमिता मुंदडा यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केले. सभागृहात मांडण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेत सहभाग घेताना त्यांनी शासन, प्रशासन आणि समाज या तिघांनीही एकत्र येऊन या भीषण संकटाचा सामना करण्याची गरज व्यक्त केली. केवळ कठोर कायदे करून चालणार नाही तर त्यांची जमिनीवर प्रभावी अंमलबजावणी होणे आणि प्रत्येक नागरिकाने आपले सामाजिक उत्तरदायित्व ओळखणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. अर्थसंकल्पीय अधिवेशनात डॉ. जितेंद्र आव्हाड आणि हेमंत ओगळे यांनी स्त्री भ्रूणहत्येच्या गंभीर विषयावर लक्षवेधी मांडली होती. या चर्चेत बोलताना आमदार नमिता मुंदडा यांनी सर्वप्रथम या ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचा एल्गार



**बीड** । प्रतिनिधी

राज्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवारी (दि.२४) बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी राज्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली बीड शाखेच्यावतीने आयोजित धरणे आंदोलनात जिल्ह्यातील विविध ▶▶ पान २ वर

## मतदारसंघातील विविध प्रश्नांविषयी

# आ.संदिप क्षीरसागरांनी घेतली महसुल मंत्री,बांधकाम मंत्र्यांची भेट

**बीड** । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांविषयी आ.संदिप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे महसुल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंह राजे भोसले यांची बुधवारी (दि.२५) रोजी मुंबई येथे भेट घेतली. बीड विधानसभा मतदारसंघातील चौसाळा येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरू करण्याबाबत राज्याचे महसुल मंत्री ना.चंद्रशेखर बानवकुळे यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी निवेदन दिले. चौसाळा हे गाव शहरापासुन सुमारे ४० कि.मी. अंतरावर आहे. बीड तालुक्याचा मोठा भाग हा चौसाळा परिसराशी जोडलेला आहे. परंतु नागरिकांना महसुल व प्रशासकीय कामांसाठी बीड शहराकडे जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत आहे. या पाश्र्वभुमीवर प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता यावी. लांबच्या गावांना कमी अंतरात शासकीय सेवा मिळावी. शेतकरी, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक व सर्वसामान्यांना दिलासा मिळावा. महसुल विभागाची कार्यक्षमता वाढावी या उद्देशाने चौसाळा



येथे अप्पर तहसिल कार्यालय तातडीने सुरू करण्याची मागणी आ.संदिप क्षीरसागर यांनी महसुल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. त्यावर मा.मंत्री महोदयांनी सदरील विषयावर सकारात्मक भुमिका दर्शवत लवकरात लवकर योग्य निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित केले. या सोबतच बीड विधानसभा ▶▶ पान २ वर

## माजलगाव-तेलगाव बस स्थानकांमध्ये महिलांच्या सुरक्षेचा

# प्रश्न गंभीर



**माजलगाव** । प्रतिनिधी

येथील सार्वजनिक वाहतुकीत महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद यांच्या वतीने माजलगाव व तेलगाव बस स्थानकांची पाहणी करण्यात आली. या पाहणीत अनेक गंभीर त्रुटी समोर आल्याने संबंधित प्रशासनाला तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात आगार प्रमुख, माजलगाव यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. सविस्तर वृत्त असे की, पाहणीदरम्यान बस स्थानक परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याचे आढळून आले. तसेच सुरक्षारक्षक व पोलीस बंदोबस्ताचा अभाव असल्यामुळे महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत चिंता ▶▶ पान २ वर

## आरोपीला तात्काळ अटक करा

# वकिलांचा कामकाजावर बहिष्कार, पायऱ्यावर बसून केले आंदोलन



**बीड** । प्रतिनिधी

जिल्हा न्यायालयामध्ये कामकाज करत असतांना एका वकिलास पाच ते सहा जणांनी मारहाण केली. सदरील या मारहाण प्रकरणी संबंधिताविरोधात शिवाजी नगर पोलिसात तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. मात्र आरोपीला अद्यापही अटक करण्यात आली नसून सदरील आरोपीस तात्काळ अटक करण्यात यावे या मागणीसाठी आज वकिलांनी कामकाजावर बहिष्कार घालत न्यायालयाच्या पायऱ्यावर बसून आंदोलन केले होते. जो पर्यंत अटक होत नाही तो पर्यंत आंदोलनातून माघार घेणार नसल्याचा पवित्रा वकिलांनी घेतला होता. अॅड. राम पांडूरंग डोंगरे यांना काल राधाकिसन रामचंद्र करपे व इतर पाच ते सहा महिला पुरूषांनी मारहाण केली. मारहाणीनंतर अॅड. डोंगरे यांनीशिवाजी नगर पोलीस ठाण्यात संबंधिताविरोधात तक्रार केली. त्यानुसार आरोपी राधाकिसन करपे व इतरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र आरोपीला पोलिसांनी अद्याप अटक केली नाही. आरोपीच्या अटकेसाठी आज जिल्हा ▶▶ पान २ वर

मराठवाडा पत्र



## संपादकीय

# अवकाळीचा फटका

थंडीला निरोप मिळाल्यानंतर उन्हाळ्याची चाहूल लागली असतानाच, मध्येच आलेल्या पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडवली. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचा थेट परिणाम महाराष्ट्राच्या हवामानावर जाणवू लागला आहे. हा पट्टा दक्षिण मध्य महाराष्ट्रापर्यंत पसरल्यामुळे राज्यातील अनेक भागात अचानक वातावरण बदलले असून अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात सध्या अंशत: ढगाळ आकाश राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. उर्वरित भागामध्ये तापमानवाढ कायम राहणार असल्याने उष्णतेचा त्रास जाणवू शकतो. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांसह मध्य महाराष्ट्रातील सोलापूरमध्ये विजांच्या कडकडाटासह हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. २३ फेब्रुवारी रोजी पूर्व विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांत वादळी पावसाचा जोर वाढण्याची शक्यता लक्षात घेता, हवामान विभागाकडून 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. गत २४ तासांत राज्यातील काही भागांना अवकाळी पावसाचा फटका बसला. मध्यरात्री नागपूर शहरासह जिल्ह्यातील काही भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. ऐन उन्हाळ्यात अचानक कोसळलेल्या पावसामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांची मोठी धावपळ उडाली. दिवसभर कडक ऊन असतानाच रात्री अनपेक्षितपणे पावसाने जोर धरल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. या पावसामुळे शहरातील काही घरांचे नुकसान झाले. राज्यासह देशातील हवामानात मोठा बदल होत आहे. थंडी, पाऊस आणि उन्हाळा अशा तिन्ही हंगामांचा अनुभव येत आहे. सकाळी थंडी आणि दुपारी कडक ऊन अशी स्थिती आहे. उत्तरेकडे थंडी तर राज्यात थंडी जवळपास गायब झाली आहे. पहाटे थोडासा गारठा जाणवतो आहे. राज्यातील काही शहरांत वायुप्रदूषण हा गंभीर मुद्दा बनला आहे. मुंबईमध्ये वायुप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असून हवा घातक बनली आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात सध्या पावसाला पोषक वातावरण आहे. उन्हाच्या झळा अधिक तीव्र होत असतानाच पावसाने हजेरी लावली आहे. धुळ्यात १४ अंश सेल्सिअस अशी राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद झाली. पुढील काही दिवसांत राज्यात उन्हाचा चटका वाढण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान या भागात पावसाचा अंदाज आहे. गत काही दिवसांपासून राज्यातील हवामान पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. फेब्रुवारी महिना असूनही पावसाने हजेरी लावली आहे. सकाळी थंडी, दुपारी कडक ऊन आणि अचानक सायंकाळी वादळी वा–यासह पाऊस अशी स्थिती अनेक भागात पाहायला मिळते. या बदलत्या हवामानामुळे नागरिकांबरोबरच शेतक–यांचीही मोठी अडचण झाली आहे. सोमवारी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. कर्नाटकपासून मराठवाड्यापर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्यामुळे राज्यात पावसाळी वातावरण निर्माण झाले आहे. धाराशिव, लातूर, नांदेड, सोलापूर, हिंगोली, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये विजांसह पावसाची शक्यता आहे. इतर भागातही आकाश ढगाळ राहू शकते. पुढील दोन दिवस पावसाचा प्रभाव कायम राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला. माजलगाव तालुक्यात वादळी वा–यासह झालेल्या पावसामुळे ज्वारी, हरभरा तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले. परळी तालुक्यातही गहू आणि हरभरा पिकांना फटका बसला. लातूर जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले. रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे गारांसह २० मिनिटे पाऊस झाला. अहमदपूर शहर व तालुक्यात, चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथे रविवारी रात्री हलक्या सरी कोसळल्या. शिरूर अनंतपाळ येथे जोरदार वारे आणि पाऊस झाला तर गुडसूर परिसरात रिमझिम पाऊस झाला. उदगीर तालुक्यात ढगाळ वातावरण होते. येरोळ आणि निलंगा परिसरात जोरदार पाऊस झाला. रेणापूर तालुक्यात गारपिटीमुळे हरभरा, गहू, ज्वारी, करडी ही रबी पिके आडवी झाली. वादळी वा–याने थैमान घातल्याने शेतक–यांची धावपळ उडाली. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रम सुरू आहेत. अचानक आलेल्या वादळी पावसाने त्यामध्ये व्यत्यय आला, भाविक भक्तांमध्ये धावपळ उडाली. वादळी वा–यासह थैमान घातलेल्या पावसामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी पुन्हा अडचणीत आला आहे. हातातोंडाशी आलेले हरभरा, गहू, ज्वारीची पिके मातीमोल झाल्याने शेतक–यांना पुन्हा एकदा सरकारच्या आश्वासनावर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. कांदे, मेथी, टोमॅटो, शेपू, मिरची, दोडका, कोबी, पालेभाज्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यंदा भरपूर प्रमाणात मोहोर आलेल्या आंब्याचे अवकाळी पावसाने नुकसान केले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतक–यांना आर्थिक झळ सोसावी लागत असल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे. राज्यात सध्या हवामान झपाट्याने बदलत असून उन्हाचा तडाखा वाढताना दिसत आहे. १८ फेब्रुवारीनंतर झालेल्या पावसामुळे काही भागात गारवा निर्माण झाला होता. मात्र गत ४८ तासांत पुन्हा उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात हवामानातील बदल जाणवत आहे. २५ फेब्रुवारीच्या आसपास मराठवाडा, कर्नाटक आणि केरळमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २६ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली आणि पुणे परिसरात रिमझिम ते मुसळधार पाऊस पडू शकतो. मार्च ते मे या कालावधीत राज्यात उष्णतेचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे. सध्या कुठेही गारपिटीचा ठोस अंदाज व्यक्त करण्यात आलेला नाही. मात्र मार्च आणि एप्रिल महिन्यात मान्सूनपूर्व हालचाली दिसू शकतात. अचानक वाढणारे तापमान, अवकाळी पाऊस आणि आर्द्र वातावरण यामुळे शेती, आरोग्य आणि दैनंदिन जीवनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी लागणार आहे.

# स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या सचिवपदी सुनील क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

अहिल्यानगर – बीड – परळी वैद्यनाथ या रेल्वे मार्गा च्या कामाला गती मिळावी तसेच शहरी भागासह ग्रामीण भागामध्ये रेल्वे कामात निर्माण होणे अडथळे प्रशासकीय पातळीवर बैठका घेणे त्याचबरोबर निधी संकल्पसाठी निवेदने सादर करणे यासह अन्य न्याय हक्कासाठी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती मागील अनेक वर्षापासून कार्यरत आहे. या समितीच्या नूतन कार्यकारणी मध्ये अध्यक्षपदी जवाहरलाल सारडा यांची नियुक्ती झालेली होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी ( दि. २५ ) बैठक संपन्न झाली.या बैठकीत सर्वानुमते दैनिक चंपावती पत्र चे संपादक सुनील नामदेवराव क्षीरसागर यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड ची बीड शहरामध्ये समितीचे सदस्य अरुण डाके यांचे निवासस्थानी बुधवारी बैठक संपन्न झाली. यावेळी अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सचिव सुनील क्षीरसागर, शांतीलाल पटेल, विष्णुदास बियाणी, रामचंद्र जोशी, अशोक म. शेटे, शिवाजी बन्सी जाधव, सय्यद नवीदुजम्मा, रवी उबाळे, अरुण बाबासाहेब डाके, महम्मद लईक अहेमद, भास्करराव जाधव, तुकाराम साळुंके, विलासराव बडगे, वाय जनार्दन राव, सखाराम मस्के, वैभव स्वामी आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील नगर – बीड – परळी या जिव्हाळ्याच्या रेल्वे मार्गासाठी दैनिक चंपावती पत्र चे संपादक स्व. नामदेवराव क्षीरसागर यांनी लेखणीच्या माध्यमातूनच स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड माध्यमातून रस्त्यावर उतरून आंदोलनासह प्रशासकीय पातळीवर देखील भरीव कामगिरी करत बीडकर यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कार्य केले होते. या बैठकीमध्ये त्यांच्या कार्याचा उल्लेख करत



उपस्थित त्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत आणि समितीच्या आजपर्यंतच्या कार्याचा अनुभव असणारे त्यांचे चिरंजीव दैनिक चंपावती पत्र चे संपादक सुनील नामदेवराव क्षीरसागर यांची सचिव पदी नियुक्ती करण्याचा ठराव मांडण्यात आला. यासाठी समितीचे सदस्य विलासराव बडगे यांनी ठराव मांडला यास अरुण डाके आणि वाय जनार्दन राव यांनी अनुमोदन देत सर्वानुमते ठराव पास करत सचिव पदी सुनील नामदेव क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली. या निवडीबद्दल उपस्थितांनी सुनीलराव क्षीरसागर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## पान १ वरून

### निवडणूकीचा बिगुल...

पार्श्वभूमीवर ज्या सहकारी संस्थेची निवडणूक घेण्याबाबत उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने आदेशीत केलेल्या सहकारी संस्था वगळून राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यात येतील. प्रलंबित सहकारी संस्थेच्या निवडणुकांकरिता अर्हता दिनांक निश्चित करणे तसेच सन २०२६ मध् निवडणुकीस पात्र होणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यासंदर्भातही आदेश देण्यात आलेत. जिल्हा, तालुका, प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडे अद्याप दाखल केलेल्या नाहीत, अशा प्रलंबित सहकारी संस्था तसेच या आदेशाच्या दिनांकापूर्वी प्राधिकृत अधिकारी, प्रशासक, प्रशासक मंडळ नियुक्त आहे, अशा सहकारी संस्था आणि हंगामी समितीची मुदत संपुष्टात आली आहे, अशा सहकारी संस्थांच्या निवडणुकीकरिता प्रारूप मतदार याद्या तयार करण्यासाठी दिनांक १ फेब्रुवारी २०२६ हा अर्हता दिनांक (कट ऑफ डेट) देण्यात आला. हा अर्हता दिनांक ३ महिन्यांकरिता वैध आहे. या अर्हता दिनांकापासून तीन महिन्याचा कालावधी होऊनही प्रारुप मतदार यादी प्राप्त न झाल्यास नव्याने प्रस्ताव अधिकाऱ्यांना प्राधिकरणाल सादर करावा लागणार आहे.

### जरांगे पाटील...

असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात शासन निर्णय काढला होता. त्यानुसार अर्ज आणि स्थानिक चौकशी अहवाल येऊनही कुणबी प्रमाणपत्र का दिली जात नाहीत? जात पडताळणी प्रमाणपत्रही दिली जात नसल्याचा आरोप करत टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या संदर्भात शासनाने तातडीने परिपत्रक काढावे, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उप समितीवर आम्ही विश्वास दाखवला, त्यांनी तो सार्थ ठरवावा. याचे रूपांतर त्यांनी गैरविश्वासात होऊ देऊ नये. जूनपर्यंतची वेळ आम्ही प्रमाणपत्र देण्यासाठी देत आहोत, त्यानंतर उपोषणाला बसलो तर एकाही मंत्र्याचे आपण ऐकणार नाही किंवा कोणाला आसपासही फिरकू देणार नाही, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला. हैदराबाद गॅझेटनुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावीत तसेच शिंदे समितीने कुणबी नोंदणी शोधण्याचे काम पुन्हा सुरू करावे, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली. मराठा आरक्षण आंदोलनात बळी पडलेल्यांच्या वारसांना महावितरण आणि औद्योगिक विकास महामंडळात नोकरी देण्यासंदर्भात आदेश काढावेत. आरक्षण आंदोलनातील दाखल गुन्हे परत घ्यावे, सारथी शिष्यवृत्तीचे तातडीने वाटप करावे. तसेच मराठा आरक्षण अनुषंगाने सातारा गॅझिटिअरच्या संदर्भात शासन निर्णय कधी काढणार? हे राधाकृष्ण विखे पाटील यांनी जाहीर करावे, अशी मागणीही मनोज जणांनी पाटील यांनी यावेळी केली. राधाकृष्ण विखे पाटील यांनी समाजासाठी चांगले काम केले आहे. त्यांनी आता आपली प्रतिमा मलीन होऊ देऊ नये. हातचे राखून काम केले तर मराठा समाज अडचणीत येईल, याकडेही जरांगे पाटील यांनी सरकारचे लक्ष वेधले.

### विधिमंडळात आ. मुंदडा...

संवेदनशील विषयाला वाचा फोडल्याबद्दल दोन्ही लोकप्रतिनिधींचे अभिनंदन केले. शासनाकडून राबवल्या जाणाऱ्या डिकॉय कारवाया, खबऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली एक लाख रुपयांची बक्षीस योजना आणि माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्याची हमी यांसारख्या उपाययोजनांचे त्यांनी स्वागत केले. मात्र, या मोहिमांचा प्रभाव वाढवण्यासाठी काही मूलभूत सुधारणांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. आमदार मुंदडा यांनी सुचवले की, स्त्री–पुरुष समानतेची जाणीव ही शालेय आणि महाविद्यालयीन स्तरापासूनच तरुण पिढीमध्ये रुजवली पाहिजे. ज्या जिल्ह्यांमध्ये स्त्री–पुरुष जन्माचे प्रमाण चिंताजनक आहे, तिथे प्रशासनाने विशेष विश्लेषण करून लक्ष्यित मोहिमा राबवणे गरजेचे आहे. तसेच, 'व्हिसलब्लोअर प्रोटेक्शन' म्हणजेच माहिती देणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अधिक कडक तरतुदी करून त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. केवळ कायद्याचा धाक दाखवून ही समस्या मुळापासून संपणार नाही, तर समाजमनात परिवर्तनाचे वारे वाहणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी आपल्या मतदारसंघातील आणि जिल्ह्यातील बालविवाहाच्या गंभीर प्रश्नाकडेही सभागृहाचे लक्ष वेधले. लग्नसराईच्या काळात होणारे अल्पवयीन मुलींचे विवाह ही आजही मोठी सामाजिक समस्या आहे. प्रशासनाने हेल्पलाइन क्रमांक दिले असले तरी समाजात अद्यापही तक्रार करण्यासाठी भीती आणि संकोच दिसून येतो. ही भीती घालवण्यासाठी सामाजिक जागरूकता वाढवणे हाच एकमेव पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक मुलगी ही कुटुंबाचा अभिमान आणि राष्ट्राची शक्ती आहे, त्यामुळे तिच्या जन्माचा अधिकार सुरक्षित ठेवणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी या विषयावर ठोस पावले उचलण्याचे आवाहन केले.

### आ.संदिप क्षीरसागरांनी...

मतदारसंघातील खरवंडी ते नवगण राजुरी दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चे विस्तारीकरण, मजबुतीकरण तसेच आवश्यक त्या ठिकाणी भुसंपादन करण्याचे काम सन २०१८ मध्ये मंजुर झालेले आहे. परंतु संबंधित कंत्राटदाराने सदरील काम अंदाजपत्रकानुसार न करता अत्यंत निकृष्ठ दर्जाचे करून अर्धवट सोडले आहे. त्यामुळे या रस्त्यावर अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. पादचाड्यांना, ग्रामस्थांना तसेच प्रवाशांना दैनंदिन प्रवासात प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, रस्त्यालगत राहणाड्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. यासोबतच या रस्त्यासाठी ज्यांनी स्वत:च्या जमिनी दिल्या आहेत त्या शेतकड्यांना आजपर्यंत योग्य मोबदला (मावेजा) मिळालेला नाही. अनेकवेळा संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून ही न्याय मिळत नसल्याने शेतकड्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे आ.संदिप क्षीरसागर यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंह राजे भोसले यांची भेट घेऊन हा महत्वाचा प्रश्न मांडला आहे.

### वकिलांचा कामकाजावर...

न्यालयातील वकिलांनी कामकाजावर बहिष्कार टाकून न्यायालयाच्या पायऱ्यासमोर आंदोलन सुरू केले होते. जो पर्यंत अटक होत नाही तो पर्यंत उठणार नसल्याचा पवित्रा सर्व वकिलांनी घेतला होता.

## पान १ वरून

### प्रश्न गंभीर...

व्यक्त करण्यात आली. बस स्थानकातील पोलीस चौकीची अवस्था अत्यंत दयनीय असून तिचा वापर वॉशरूम म्हणून होत असल्याचेही निदर्शनास आले.महिलांसाठी अत्यावश्यक असलेला 'हिरकणी कक्ष' उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले.आपत्कालीन परिस्थितीत मदतीची अडचण निर्माण होत असल्याचे परिषदेकडून सांगण्यात आले. याशिवाय महिला हेल्पलाईन क्रमांकाचा फलक नसल्यामुळे महिलांना तातडीने संपर्क साधता येत नाही, अशीही तक्रार करण्यात आली.महिलांसाठीचे स्वच्छतागृह बसथांब्यापासून दूर असून त्याची स्वच्छता समाधानकारक नसल्यामुळे महिला प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तसेच बस स्थानक परिसरात खाजगी वाहनांचे मुक्त पार्किंग होत असल्यामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत असल्याचेही पाहणीत स्पष्ट झाले. या सर्व बाबींचे जीपीएस फोटो पुराव्यासह प्रशासनाला सादर करण्यात आले असून, नवीन बस स्थानकाचे बांधकाम सुरू असले तरी तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात आवश्यक सुविधा व सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रती माननीय आमदार तसेच शहर पोलीस स्टेशन, माजलगाव यांनाही देण्यात आल्या असून प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी माजलगाव विकास प्रतिष्ठान च्या सचिव नीला देशमुख, डॉ. वरुणराज तौर, अर्चना जाधव, ललिता सोळंके, मीना कदम, सखाराम जोशी, संतोष पालकर उपस्थित होते.

### बीडमध्ये लिपिकवर्गीय...

तालुक्यांतील पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून शासन दरबारी प्रलंबित असल्याने वारंवार निवेदने व पाठपुरावा करूनही निर्णय होत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. आंदोलनादरम्यान कर्मचाऱ्यांनी वेतन त्रुटी तात्काळ दूर करून योग्य वेतनश्रेणी लागू करावी, पदोन्नती प्रक्रियेला गती देऊन वरिष्ठतेनुसार न्याय द्यावा, रिक्त पदे तातडीने भरावीत, समान कामासाठी समान वेतन लागू करावे, सेवा अटी व नियमांमध्ये सुधारणा करावी तसेच प्रलंबित भत्ते व देयके तातडीने अदा करावीत, अशा प्रमुख मागण्या मांडल्या. यावेळी कर्मचाऱ्यांनी आपापल्या कार्यालय प्रमुखांना सामूहिक निवेदने सादर केली. मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास असहकार आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. अतिरिक्त कामांना नकार देणे तसेच कामकाजावर मर्यादा आणणे अशा टप्प्याटप्प्याने आंदोलन करण्याचा निर्णय कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला. दरम्यान, महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन, डीएनई १३६ संघटनेच्यावतीने जिल्हाध्यक्ष मधुकर शेळके यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या राज्य महिला संपर्क प्रमुख जनाबाई गोसावी, जिल्हा पालक अध्यक्ष श्रीरंग धन्वे, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर आगळे, जिल्हा कार्याध्यक्ष महादेव सोनवळकर, कोषाध्यक्ष खंडोजी गोरे, सचिव दिपक जाधव यांच्यासह पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. * आंदोलन सुरूच राहणार : श्रीरंग धन्वे : पालक जिल्हाध्यक्ष श्रीरंग धन्वे यांनी आंदोलनादरम्यान सांगितले की, हे आंदोलन केवळ एक दिवसापुरते मर्यादित नसून राज्य नेतृत्वाकडून आंदोलन मागे घेण्याचे निर्देश येईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे. शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. * शासकीय कामकाजावर परिणाम : राज्यभरातील विविध जिल्ह्यात लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी आंदोलन छेडल्याने अनेक शासकीय कार्यालयांच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. नागरिकांच्या दैनंदिन कामांवरही या आंदोलनाचा परिणाम जाणवू शकतो. राज्यातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचा लढा आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून शासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ५ लाख ३९ हजार...

करण्यात आली आहे. विभागातील एकल महिलांमध्ये विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता तसेच ४० वर्षांपुढील अविवाहित महिलांचा समावेश आहे. या महिलांचे प्रश्न गंभीर असून प्रशासनाच्या माध्यमातून त्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांच्या संख्येचे अचूक आकलन व्हावे, यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले आहे. जिल्हा परिषदांमार्फत अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्यात आले असून आठ जिल्ह्यांतील ग्रामीण भागात ४ लाख ९३ हजार ४५० महिलांची नोंद झाली आहे. सर्वेक्षणाच्या विश्लेषणानुसार विधवा महिलांची संख्या सर्वाधिक आहे. एकूण विधवा महिला ४ लाख ८४ हजार ६३७ आहेत. घटस्फोटीत महिलांची संख्या १४ हजार ४६३, परित्यक्ता महिलांची संख्या २१ हजार १४२, तर ४० वर्षांपुढील अविवाहित महिलांची संख्या १६ हजार ६३७ आहे. वयोगटानुसार केलेल्या विश्लेषणात १८ ते ३० वयोगटातील ३२ हजार ९६६ महिला, ३१ ते ५० वयोगटातील १ लाख ३९ हजार ७६२ महिला असून या दोन्ही गटांचे प्रमाण सुमारे ३२ टक्के आहे. ५१ ते ६५ वयोगटातील १ लाख ६४ हजार ८१८ महिला तर ६५ वर्षे व त्यापुढील ज्येष्ठ महिलांची संख्या २ लाख ३ हजार ३८७ एवढी आहे. सर्वेक्षणानंतर विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी तसेच नागरी बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित केली. या बैठकीत एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबवायच्या उपाययोजना तसेच कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस 'साऊ एकल महिला समिती'चे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी उपस्थित होते. तसेच विभागीय महिला व बाल विकास उपायुक्त, अपर आयुक्त (महसूल) आणि अपर आयुक्त (विकास) यांचीही उपस्थिती होती. बैठकीत एकल महिलांना आवश्यक असलेली कागदपत्रे जसे आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, आयुष्यमान कार्ड तसेच इतर शासकीय सेवा ग्रामपंचायत स्तरावर तातडीने उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. या महिलांच्या मुला–मुलींसाठी असलेल्या बालसंगोपन योजनेत पात्र विद्यार्थ्यांचा समावेश करण्यासाठी शिक्षण विभागामार्फत शाळांच्या मुख्याध्यापकांकडून अर्ज भरून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. रोजगारक्षम महिलांना महिला बचत गटांमध्ये समाविष्ट करणे, प्रत्येक तालुक्यात उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या कार्यशाळा आयोजित करणे अशा उपक्रमांचाही प्रारंभी निर्णय घेण्यात आला आहे. विभागातील सर्व जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यांमध्ये एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी नाविन्यपूर्ण उपाययोजनांवर स्वतंत्र बैठका आयोजित कराव्यात, असे निर्देशही विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी दिले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### नवगण राजुरी येथे आजपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

येथे वै.ह.भ.प.रामबाबा खांबेकर यांच्या संकल्पनेतुन साकार झालेला प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त दि.२६ फेब्रुवारी ते दि.०५ मार्च या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० गाथापारायण, १० ते १२ संत तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी २ ते ४ संत तुकाराम महाराज चरित्र, सायंकाळी ४ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन होणार असून यात ह.भ.प.नामदेव महाराज बहिर, वचिष्ठ महाराज गवते, दिपक महाराज जोशी, रामानंद महाराज पुरी, रावसाहेब महाराज शेळके, प्रा.प्रशांत पवळ, ह.भ.प.विठ्ठल महाराज बहिर यांचे प्रवचन तर ह.भ.प.गुरूवर्य महंत शिवाजी महाराज, श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड, अंगद महाराज काशिद, हरी महाराज गवते, महंत रामानंद महाराज भारती, दत्ता महाराज सोळंके, अक्षय महाराज पिंगळे, श्रीरंग महाराज डोंगरे यांचे हरीकिर्तन होणार आहे. या सप्ताहाची सांगता गुरूवार दि.५ मार्च रोजी सकाळी भव्य दिव्य नगरप्रदर्षणा होईल, त्यानंतर १० ते १२ या वेळेत ह.भ.प.आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांचे संत तुकाराम महाराज वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त काल्याचे किर्तनाने होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. तरी या अखंड हरीनाम सप्ताहाचा भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन जगदगुरू संत तुकाराम महाराज बहिर मंडळ, नवगण राजुरी यांनी केले आहे.

### पिंपळनेर परिसरात अवकाळी पावसाने हरभरा, गहू, ज्वारी भिजली

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात सोमवारी अचानक सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे. नाथापूर, ईट ,जवळा ,घाटसावळी,नाळवंडी सह अनेक गावांमध्ये पावसाने धुमाकूळ घातला. रब्बी हंगामातील हरभरा, गहू, ज्वारी ही काढणीला आलेली पिके भिजून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून द्राक्ष, डाळिंब व आंबा बागांनाही जबर फटका बसला आहे. दुपारी चारनंतर अचानक वारे सुटून पावसाने जोर धरताच शेतकऱ्यांची सर्व गणिते कोलमडली. गहू व ज्वारीची पिके जमिनीवर आडवी झाली असून दाण्याची गुणवत्ता घसरल्याने उत्पादन घटण्याची भीती निर्माण झाली आहे. द्राक्ष बागांमध्ये घड फुटणे, बुरशीजन्य रोगांचा फैलाव व गळ वाढली आहे. तर डाळिंब बागांमध्ये फळगळ व डागांनी उत्पादक हवालदिल झाले आहेत. अनेक ठिकाणी आंब्याच्या कैऱ्या जमिनीवर पडल्याने बागायतदारांचे मोठे नुकसान झाले आहे. काढणीसाठी मजूर, वाहतूक आणि बाजारपेठेचे नियोजन करून ठेवलेल्या शेतकऱ्यांवर पावसाने आर्थिक आघात केला आहे. काढणीला आलेली ज्वारी अवकाळी पावसाने पूर्ण भिजली. आता कडबा व ज्वारीची गुणवत्ता घसरून दर कवडीमोल मिळण्याची वेळ आली आहे. अपेक्षित उत्पन्न हातातून निसटत आहे. वादळी वाऱ्यामुळे काही भागात वीजपुरवठा खंडित झाला होता . दरम्यान, शासनाने केवळ आश्वासने न देता तत्काळ पंचनामे करून प्रत्यक्षात नुकसानभरपाई द्यावी, तसेच पीकविमा योजनेंतर्गत मदत त्वरित खात्यात जमा करावी अशी मागणी नितीन शिरसाट यांनी केली आहे. हवामानातील अनिश्चिततेमुळे पुढील दिवसांतही पावसाची शक्यता असून आधीच संकटात सापडलेला शेतकरी अधिकच अस्वस्थ झाला आहे.

### कांद्याचे भाव डगडल्याने उत्पादन खर्चही निघेना ; शेतकरी हवालदील

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरातील बेलवाडी, बाभुळवाडी,सांडरवन, नाथापूर, जवळा ईट, मन्यारवाडी, घाटसावळी, आडगाव कुककडगाव, नाळवंडी तसेच विविध वाड्या-वस्त्यांवरील शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात उन्हाळी गरवी कांद्याची लागवड करतात. या बहुतांशी गावामध्ये मोठे बागायतदार तसेच छोटे शेतकरी हे हळवे आणि गरी कांद्याची लागवड करत असतात व त्यातून त्यांना चार पैसे अधिकचे मिळत असतात, परंतु, या वर्षी कांद्याचे भाव मोठ्या प्रमाणात गडगडल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. गेल्या वर्षी कांद्याला बऱ्यापैकी भाव मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी या वर्षी कांदा लागवड मोठ्या प्रमाणात केली होती. हळवे कांद्यापेक्षा गरवी कांद्याला ग्राहकांची मोठ्या प्रमाणात मागणी असते. कारण गरवी कांदा वर्षभर साठवला तरी खराब होत नाही. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांबरोबरच सर्वसामान्य ग्राहक देखील वर्षभर पुरेल एवढा कांदा खरेदी करीत असतात. परंतु बाजारभाव पडल्यामुळे ग्राहकांचा फायदा होणार असला, तरी शेतकरी मात्र कर्जाच्या खाईत लोटण्याची शक्यता आहे.

### एसटीतील करोडो-अरबोंचा भ्रष्टाचार थांबवा ; महिला व ज्येष्ठांच्या सवलतींना हात लावू नका - नितीन जायभाये यांचा इशारा

### परिवहन विभाग व राज्य शासनाने चुकीचे आर्थिक धोरण बदलावे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची व ग्रामिण व्यवस्थेची जीवनवाहिनी असलेल्या राज्य परिवहन महामंडळाबाबत (एसटी) सुरू असलेल्या निर्णय प्रक्रियेवर तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. महिलांचे अर्धे तिकीट आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना दिली जाणारी मोफत प्रवास सुविधा बंद करण्याचा विचार सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते नितीन जायभाये यांनी आक्रमक भूमिका घेत सरकारला थेट इशारा दिला आहे. एसटी तोट्यात असेल, तर त्याला सामान्य जनता जबाबदार नाही. चुकीची आर्थिक धोरणे, व्यवस्थापनातील त्रुटी आणि मेंटेनन्समधील करोडो-अरबोंचा भ्रष्टाचार हेच खरे कारण आहे. सवलती बंद करून सरकार स्वतःच्या अपयशावर पांघरूण घालत आहे, असा घणाघाती आरोप त्यांनी केला. एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून ग्रामीण महाराष्ट्राचा श्वास असल्याचे सांगत नितीन जायभाये म्हणाले, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि विशेषतः माता-भगिनींचा आधार म्हणजे एसटी. महिलांचे अर्धे तिकीट हे दान नसून त्यांचा हक्क आहे. ते बंद करणे म्हणजे त्यांच्या स्वावलंबनावर घाला घालणे होय. तसेच ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास हा त्यांचा सन्मान आहे. हा सन्मान हिरावून घेणे म्हणजे त्यांच्या आयुष्यभराच्या कष्टांचा अपमान आहे.

# राज्यातील 255 मराठी शाळा बंद : शिक्षणमंत्री दादा भुसे

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्यात विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळामध्ये प्रवेश देण्याकडे पालकांचा कल वाढत असून कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात २५५ मराठी शाळा बंद झाल्याची कबुली खुद्द शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली. मराठी शाळांचा पट वाढविण्यासाठी सरकारकडून विविध उपाययोजना करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. राज्यात दोन हजार मराठी शाळा अडचणीत आल्या असून २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याबाबतचा तारांकित प्रश्न अमोल मिटकरी, विक्रम काळे यांनी उपस्थित केला.

राज्यात २०२५मध्ये ६२० मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचा परिणाम म्हणून ७० गावांत 'ना शाळा ना पाटी-पेन्सिल' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे मराठी शाळा वाचविण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिक्षक, विद्यार्थी व संस्थाचालकांनी लाखोंच्या संख्येने मोर्चा काढून शासनाला निवेदन दिल्याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला. यावर उत्तर देताना दोन हजार मराठी शाळा अडचणीत तसेच २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याची बाब मंत्री दादा भुसे यांनी आपल्या लेखी उत्तरात फेटाळली. त्याचप्रमाणे मराठी शाळा बंद करण्याचा कोणताही निर्णय सरकारने घेतला नसल्याचेही स्पष्ट केले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोर्चा काढण्यात आल्याची बाब खरी असून पालकांचा कल इंग्रजी माध्यमांत पाल्यांचा प्रवेश घेण्यासाठी वाढत असल्याने मागील दोन वर्षांच्या तुलनेत कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या भागांत २५५ मराठी शाळा बंद पडल्याची कबुली त्यांनी दिली.

#### शाळांचा पट वाढविण्यासाठी प्रयत्न

**राज्यात कमी पटाच्या मराठी शाळा सुरू असताना शाळांचा पट वाढविणे व मराठी शाळा टिकवणे यासाठी उपाययोजना करीत असल्याचे त्यांनी सांगितले. शाळा प्रवेशोत्सव, इयत्ता पिहली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप, प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना, इयत्ता पहिले ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पायमोजे, बूट, निपूण महाराष्ट्र, समग्र शिक्षा अभियान, स्टार्स प्रकल्प, पीएमश्री प्रकल्प, माझी मराठी सुंदर शाळा, नियतकालिक चाचण्या, शिक्षक प्रशिक्षण उपक्रम इ. उपाययोजनांची अंमलबजावणी सरकारकडून करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.**

## बीड शहरातील सैनिकी विद्यालयामध्ये इयत्ता सहावीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

### डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते प्रवेश माहिती पुस्तिकेचे विमोचन ; पालकांनी अर्ज करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**



तालुक्यातील नवगण शिक्षण संस्था संचलित सैनिकी विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी इयत्ता ६ वीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन विद्यालय प्रशासनाने केले आहे. यानिमित्त प्रवेश माहिती पुस्तिकेचे विमोचन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी संस्था प्रशासकीय अधिकारी डॉ.व्ही.टी.देशमाने, डॉ.सुधाकर गुट्टे, सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य सचिन पवार, उपप्राचार्य रविंद्र झोडगे, राजकुमार ससाणे, गणेश निर्मळ, शिवाजी सोनवणे व मेघराज कोल्हे उपस्थित होते. इयत्ता ६ वीसाठी खुली तुकडी ४५ व आदिवासी तुकडी ४५ अशा एकूण ९० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेश पूर्व निवड प्रक्रिया इयत्ता ५ वीच्या अभ्यासक्रमावर आधारित लेखी परीक्षेद्वारे होणार असून पात्र विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. इयत्ता ५ वी मध्ये शिकत असलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र राहतील. प्रवेश अर्ज १० फेब्रुवारी २०२६ ते ११ एप्रिल २०२६ या कालावधीत सैनिकी विद्यालय, बीड येथे सकाळी ९ ते सायं. ४ या वेळेत उपलब्ध राहतील. प्रवेश परीक्षा रविवार, दि.१२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत सैनिकी विद्यालय, बीड येथे घेण्यात येणार आहे. परीक्षेचा निकाल सोमवार दि.२० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विद्यालयाच्या नोटीस बोर्डवर जाहीर केला जाईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा, फिटनेस चाचणी व वैद्यकीय तपासणी दि.२३ व २४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८ वाजता घेण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य सचिन पवार यांनी केले आहे.

## एका नव्या पर्वाची सुरुवात: 'आयुर्वेद' हेच भविष्यातील जागतिक आरोग्यशास्त्र!



**खेड (रत्नागिरी)**

येथील 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या' पदवीप्रदान समारंभात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहण्याचा आणि भविष्यातील तरुण वैद्यांशी संवाद साधण्याचा एक अतिशय सुंदर योग आला. विद्यार्थ्यांना संबोधित करताना मी प्रकर्षाने मांडले की, आज तुम्ही अशा काळात वैद्यकीय क्षेत्रात पाऊल ठेवत आहात, जेंव्हा आयुर्वेद ही केवळ 'पर्यायी चिकित्सा' राहिलेली नाही, तर ती जगाची मुख्य गरज बनली आहे. आज पाश्चिमात्य देश 'रुग्णसेवेकडून' 'आरोग्यसेवेकडे' वळत आहेत. प्रत्येक आजारासाठी एक नवीन गोळी शोधण्यापेक्षा, माणूस आजारीच पडू न देणे हा आयुर्वेदाचा 'सर्वांगीण दृष्टिकोन' आज संपूर्ण जग स्वीकारत आहे. देशाचे सन्माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आज आयुर्वेदाला जागतिक स्तरावर अभूतपूर्व प्रतिष्ठा मिळत आहे. परदेशी नागरिकांना भारतात येऊन आयुर्वेद आणि पारंपरिक भारतीय उपचार पद्धतींचा लाभ घेता यावा, यासाठी केंद्र सरकारने नव्याने सुरू केलेला 'आयुष व्हिसा' (-ïीह तळीर) हा एक अत्यंत क्रांतिकारी आणि प्रगतीशील निर्णय ठरला आहे.

## जिल्हापरिषदेत लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार

# जिल्हा परिषदेच्या स्वमिळकत निधीचा हवा तसा वापर : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**



सर्वोच्च न्यायालयाने अनिश्चित काळासाठी राज्यातील उर्वरित जिल्हा परिषदेच्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांची मर्जी पुढील काही महिने राहणार असल्याने अधिकारी मनमानी कारभार करत असुन जनतेच्या पैशातून अनावश्यक कामांसाठी निधी देऊन मर्जीतील कंत्राटदार पोसण्याचे काम सुरू असल्याने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी तिव्र नाराजी व्यक्त करत अनावश्यक बाबी ऐवजी अत्यावश्यक बाबींसाठी निधी खर्च करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे सीईओ जतिन रहेमान आणि जिल्हाधिकारी नवनित कांवत यांच्याकडे केली आहे. मागील काही वर्षांपर्यंत जिल्हा परिषदेच्या स्वमिळकत निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने जिल्हा परिषद बांधकाम विभाग या निधीचा हवा तसा वापर करत असल्याचे निदर्शनास येत आहे. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने १० लाख आणि ७ लाख अशा दोन प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत. यातील एका कामाचे स्वरूप पंचायत समिती आवारातील अधिकारी कर्मचारी निवासस्थानांची संरक्षण भिंत बांधणे असे आहे.या कामाची रक्कम ९ लाख ९९ हजार ८९५ रुपये इतकी आहे तर जिल्हा परिषद नविन प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर व विविध कामे करणे या कामासाठी ६ लाख ८६ हजार २७१ रुपयांची प्रशासकीय मान्यता अर्थात कार्यारंभ आदेश दिलेला आहे.


### चौकशीची जाहीर नोटीस

**धर्मादाय उप आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड विभाग, बीड**

**प्रेमपद्म (नहार) बिल्डींग, औटी मंगल कार्यालयाजवळ, एस.बी.आय. समोर, जालना रोड, बीड-४३११२२.**
**दूरध्वनी क्र.** ०२४४२-२२२८०४, Wesbite charity.maharashtra.gov.in

बदल अर्ज क्रमांक - २३/२०२५ कलम ५० (अ) (१)
**सार्वजनिक न्यासाचे नाव :- श्री देऊळ हनुमान, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड**
व नोंदणी क्र.- ए-०१८०१ / बीड
**अर्जदार : श्री विनायक विश्वनाथराव खंडागळे व इतर ०१,**
विरुध्द
गैरअर्जदार : कोणी नाही

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी वर नमुद न्यासासाठी योजना मंजुर करुण मिळणेसाठी म.सा. वि.व्य. अधिनियम १९५० चे कलम ५० (अ) (१) अन्वये अर्ज केला आहे.

ज्याअर्थी, वरील सार्वजनिक न्यासासंबंधात कलम ५० (अ) (१) अन्वये योजना मंजुर करणेसाठी मा.धर्मादाय उप आयुक्तसो, बीड विभाग, बीड हे चौकशी करणार आहेत. त्या अर्थी, हितसंबंधीत लोकाच्या माहितीसाठी सदर नोटीस काढण्यात येत आहे. या कामी कोणाला काही सांगावयाचे असेल किंवा काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत सर्व पुरावे / कागदपत्रांसह पुढील नेमलेल्या तारखेस स्वतः / वकिला मार्फत अथवा टपालाने या कार्यालयामध्ये सादर करावे. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही.

सदरचे प्रकरण हे दि. ०९/०३/२०२६ रोजीच्या बोर्डावर ठेवण्यात आलेले आहे.

या कामी वरील मुदतीत कोणाची काही हरकत आली नाही तर सदरील चौकशी प्रकरण पुढे चालवून निकाली काढण्यात येईल, सदरची नोटीस माझ्या सहीने व मा. धर्मादाय उपआयुक्त, बीड विभाग, बीड यांचे शिक्क्यानिशी आज दि. २४/०२/२०२६ रोजी दिली.

**(स्वाक्षरीत)**
**(एस पी सपकाळ)**
**वरिष्ठ लिपीक**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**बीड विभाग बीड**

### चौकशीची जाहीर नोटीस

**धर्मादाय उप आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड विभाग, बीड**

**प्रेमपद्म (नहार) बिल्डींग, औटी मंगल कार्यालयाजवळ, एस.बी.आय. समोर, जालना रोड, बीड-४३११२२.**
**दूरध्वनी क्र.** ०२४४२-२२२८०४, Wesbite charity.maharashtra.gov.in

बदल अर्ज क्रमांक - २५/२०२५ कलम ५० (अ) (१)
**सार्वजनिक न्यासाचे नाव :- श्री त्रिविक्रम देवस्थान, मंजरथ ता. माजलगांव, जि. बीड**
व नोंदणी क्र.- ए-०१७३५ / बीड
**अर्जदार : श्री प्रकाश पंडितराव बडवे व इतर ०१,**
विरुध्द
गैरअर्जदार : कोणी नाही

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी वर नमुद न्यासासाठी योजना मंजुर करुण मिळणेसाठी म.सा. वि.व्य. अधिनियम १९५० चे कलम ५० (अ) (१) अन्वये अर्ज केला आहे.

ज्या अर्थी, वरील सार्वजनिक न्यासासंबंधात कलम ५० (अ) (१) अन्वये योजना मंजुर करणेसाठी मा.धर्मादाय उप आयुक्तसो, बीड विभाग, बीड हे चौकशी करणार आहेत.

त्या अर्थी, हितसंबंधीत लोकाच्या माहितीसाठी सदर नोटीस काढण्यात येत आहे. या कामी कोणाला काही सांगावयाचे असेल किंवा काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत सर्व पुरावे / कागदपत्रांसह पुढील नेमलेल्या तारखेस स्वतः / वकिला मार्फत अथवा टपालाने या कार्यालयामध्ये सादर करावे. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही.

सदरचे प्रकरण हे दि. ०९/०३/२०२६ रोजीच्या बोर्डावर ठेवण्यात आलेले आहे.

या कामी वरील मुदतीत कोणाची काही हरकत आली नाही तर सदरील चौकशी प्रकरण पुढे चालवून निकाली काढण्यात येईल, सदरची नोटीस माझ्या सहीने व मा. धर्मादाय उपआयुक्त, बीड विभाग, बीड यांचे शिक्क्यानिशी आज दि.२४/०२/२०२६ रोजी दिली.

**(स्वाक्षरीत)**
**(एस पी सपकाळ)**
**वरिष्ठ लिपीक**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**बीड विभाग बीड**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक
# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ •

## थोडक्यात...

### आज वाणगाव फाटा येथे जलाल महाराज सय्यद करजिकर नाशिक यांचे किर्तन

**मांजरसुबा ।** प्रतिनिधी

गुरुनाम गुरु बंकट स्वामी महाराज याच्या आशीर्वादाने तसेच गुरुवर्य सुदाम देव बाबा यांच्या आशीर्वादाने आणि गुरुवर्य शांतिब्रह्म राम हरी बाबा यांनी चालू केलेल्या जगदुरू तुकोबाराय यांच्या बीज उत्सव या कार्यक्र माच्या निमित्ताने चालू असलेल्या कार्यक्रमांमध्ये वानगाव फाटा येथे पहिल्या दिवसाची दि २६ रोजीची कीर्तन सेवा महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार ज्याने आपल्या मधुर वाणीतुन महाराष्ट्र भर वारकरी सांप्रदायाची भगवी पथाका आपल्या शेवेतुन फडकवली आसे सर्व दर्शन जलाल महाराज सय्यद करजिकर नाशिक यांची होणार आहे तरीही परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या किर्तन रुपी सेवेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन हारीदास भाऊ जोगदंड विष्णू पंत महाराज लोंढे यांनी केले आहे.

### श्री क्षेत्र नारायणगड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त व्याख्यानाचे आयोजन

**बीड ।** प्रतिनिधी

श्री क्षेत्र नारायणगड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते प्रा. यशवंत गोसावी यांचे व्याख्यानाचे आयोजन केले आहे. हा सोहळा गडाचे मठाधिपती प्रेममूर्ती ह.भ.प. शिवाजी महाराज, उत्तराधिकारी ह.भ.प. संभाजी महाराज यांच्या आशीर्वादाने व संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राष्ट्रमाता जिजाऊ चे वंशज शिवाजी राजे जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वर्ष नववे,स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा शुक्रवार दिनांक २७/ २/ २०२५ रोजी वेळ सकाळी ११ वाजता गडाचे मठाधिपती प्रेममूर्ती ह.भ. प. शिवाजी महाराज ह.भ.प. संभाजी महाराज यांच्या आशीर्वादाने व संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी प्रमुख उपस्थिती म्हणून राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांचे वंशज सिंदखेड राजाचे शिवाजी राजे जाधव लाभणार आहे,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिव व्याख्यानकार प्रा.यशवंत गोसावी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले तसेच रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे वकृत्व स्पर्धा निबंध स्पर्धा चित्रकला आयोजित स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे तरी श्री क्षेत्र नारायणगड परिसरातील शिवभक्तांनी उपस्थित राहावक.

### चौसाळा येथील महिलांना साडीचे वाटप



**चौसाळा ।** प्रतिनिधी

तालुक्यातील चौसाळा येथील पत्रकार संघटनेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य विकास नाईकवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त चौसाळा येथील ग्रामपंचायतीच्या सफाई कामगार महिलांना साडीचे वाटप करण्यात आले. पत्रकार विकास नाईकवाडे यांचा वाढदिवस प्रत्येक वर्षी विविध उपक्रमांनी साजरी केला जातो याहीवर्षी अवाजवी खर्चाला फाटा देत सामाजिक उपक्रम राबवत चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये साडी चे वाटप करण्यात आले यावेळी चौसाळा शहराच्या सरपंच सौ मंगल प्रेमचंद लोढा , ज्येष्ठ नेते प्रेमचंद उर्फ बाबू शेठ लोढा ग्रामपंचायत सदस्य सौ विजया किशोर ढोकणे , सौ ज्योती बाबासाहेब जाधव , सौ आशा अंकुश सोनवणे , सौ पल्लवी सुरेश तोडकर , सौ शमा अजाउद्दिन शेख , सौ सायरा इस्माईल शेख व ग्रामपंचायतचे कर्मचारी उपस्थित होते.

### सुभाष ढवळे यांना आदर्श पुरस्कार

**कडा ।** प्रतिनिधी

गेल्या आठ ते दहा वर्षांपासून श्रीगोंदा येथील व गोरगरिबांसाठी झटणारा खरा सामाजिक कार्यकर्ता सुभाष ढवळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत आजपर्यंत सर्वधर्मीय मुला-मुलींचे १६०० शुभविवाह जमविले आहेत. श्री सुभाष ढवळे यांना प्रहार दिव्यांग संघटना अहिल्यानगर आणि जय मल्हार फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. अहिल्यानगर येथे महाराष्ट्र राज्य यशवंत सेना सरसेनापतीचे संस्थापक अध्यक्ष माधव गडदे, अहिल्यानगर यशवंत सेना जिल्हा अध्यक्ष श्री विजय तमनर, आमदार संग्रामभैय्या जगताप यांचे बंधू श्री सचिनभैय्या जगताप, खासदार श्रीकांत शिंदे फाउंडेशन जिल्हाप्रमुख श्री राजेंद्र पोकळे या सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते श्री सुभाष ढवळे यांना राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री सुभाष ढवळे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे, माजी मंत्री बबनराव पाचपुते, अहिल्यानगर शहराचे आमदार संग्रामभैय्या जगताप, श्रीगोंदाचे विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते, सांगली पंचायत समितीच्या माजी सदस्या अनिताताई कदम तसेच रयत शेतकरी संघटना सातारा जिल्हाध्यक्ष संजय लाड, जामखेड तालुक्यातील हळगावचे मा. उपसरपंच आबासाहेब ढवळे यांच्यासह महाराष्ट्रातील अनेकांनी सुभाष ढवळे यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत विधानपरिषदेचे सभापती प्रा. ना. राम शिंदे यांनी एका लग्न सोहळ्यानिमित्त सुभाष ढवळे यांची भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली तसेच सुभाष ढवळे यांच्या सामाजिक कार्याबद्दल प्रा.ना. राम शिंदे यांनी तोंड भरून कौतुक केले.

# 'हृदयरुग्णही विक्रीस !!!'

# महावितरणमध्ये बदली म्हणजे लिलाव – पैसे दिले तरच बदली, नाहीतर जीव धोक्यात!

## •अंबाजोगाई–बीड बदली घोटाळ्याचा भडका

● बायपास सर्जरी झालेला कर्मचारी प्रथम प्राधान्यक्रमावर असूनही ५ वर्षे बदलीपासून वंचित

● एजंटमार्फत पैसे देणाऱ्यांच्या बदल्या तात्काळ – महावितरण बदली नियमांना उघड हरताळ




**बीड ।** प्रतिनिधी

महावितरण अंबाजोगाई विभागीय कार्यालय व बीड मंडळ कार्यालयात बदली ही सेवा गरज, वैद्यकीय आधार किंवा प्राधान्यक्रमावर नव्हे, तर थेट पैशांच्या बोलीवर ठरत असल्याचा गंभीर आणि धक्कादायक आरोप समोर आला आहे. हृदयविकार होऊन बायपास सर्जरी झालेला कर्मचारी, जो महावितरणच्या अधिकृत बदली नियमांनुसार वैद्यकीय आधारावर प्रथम प्राधान्यक्रमावर येतो, त्याने २०२१ ते २०२६ या पाच वर्षांत सहा वेळा लेखी व ऑनलाईन अर्ज करूनही बदली नाकारण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

महावितरण प्रशासनाने वेळोवेळी जारी केलेल्या बदली परिपत्रकांनुसार – वैद्यकीय (Medical Ground) बदलीस सर्वोच्च प्राधान्य, हृदयविकार, बायपास सर्जरी यांसारख्या गंभीर आजारांमध्ये तात्काळ बदली बंधनकारक, विनंती बदलीसाठी गुणांकन (Merit / Priority List) व पारदर्शक प्रक्रिया, एजंट, दलाल, मध्यस्थ किंवा आर्थिक व्यवहारास सक्त मनाई असे स्पष्ट नियम असतानाही अंबाजोगाई व बीड कार्यालयात या सर्व नियमांचे उघड उल्लंघन सुरू असल्याचा आरोप आहे.

ऑडिओ क्लिपसह ठोस पुरावे – चौकशीची मागणी : या प्रकरणात तक्रारदाराकडे पुढील पुरावे उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे – बदलीसाठी पैशांची मागणी झाल्याच्या फोन संभाषणाच्या ऑडिओ क्लिप, २०२१ ते २०२६ दरम्यानचे सहा लेखी व ऑनलाईन अर्ज, बायपास सर्जरीची वैद्यकीय कागदपत्रे, प्राधान्य यादीत प्रथम क्रमांक असल्याचे पुरावे, संपूर्ण बदल्यांची चौकशी करा भ्रष्टाचार उघड होईल.

तक्रारदाराची मागणी आहे की – २०२१ ते २०२५ या कालावधीत झालेल्या वैद्यकीय बदल्या, विनंती बदल्या, प्रशासकीय व प्रमोशन बदल्या, कोणत्या कर्मचाऱ्यांची बदली किती कालावधीत झाली? कोणत्या अधिकाऱ्यांमार्फत कोण एजंट कार्यरत होते? याची स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी झाल्यास बदलीतील भ्रष्टाचाराचे जाळे उघड होईल.

गुन्हा दाखल व निलंबनाची मागणी– हा प्रकार भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८, महावितरण सेवा शिस्त व अपील नियम, महाराष्ट्र नागरी सेवा आचारसंहिता, यांचे थेट उल्लंघन ठरत असल्याने संबंधित अधिकारी, त्यांचे एजंट व दलाल यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून निलंबन करण्यात यावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

हृदयरुग्णावर अमानुष अन्याय: बायपास सर्जरी झालेल्या कर्मचाऱ्याला वैद्यकीय आधारावर बदली न देणे म्हणजे फक्त नियमभंग नव्हे, तर मानवतेलाही हरताळ फासण्याचा प्रकार असल्याची तीव्र भावना व्यक्त होत आहे.

घोटाळेबाजांकडे चौकशी देऊ नका – मुख्य कार्यालयावर थेट मागणी: तक्रारदाराने ठामपणे मागणी केली आहे की – महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र आणि संचालक (मानव संसाधन) मा. राजेंद्र पवार यांनी थेट मुख्य कार्यालयातील वरिष्ठ व निष्पक्ष अधिकाऱ्यांमार्फतच चौकशी करावी. तक्रारदाराचा अर्ज किंवा चौकशी मुख्य अभियंता, लातूर यांच्याकडे पाठवू नये, कारण – ज्यांच्या कार्यकाळात हा बदली घोटाळा घडला ज्यांच्या अधिनस्त अधिकारी–एजंट साखळी कार्यरत होती. त्यांच्याकडेच चौकशी देणे म्हणजे घोटाळेबाजांकडूनच घोटाळ्याची चौकशी करून घेणे ठरेल, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. चौकशी लातूरकडे दिल्यास मुख्य कार्यालयाची संमती होती, असा अर्थ निघेल. तक्रारदाराचा स्पष्ट इशारा – जर हा अर्ज किंवा चौकशी मुख्य अभियंता, लातूर यांच्याकडे पाठवली गेली, तर याचा थेट अर्थ असा घेतला जाईल की अंबाजोगाई–बीड येथील बदली घोटाळा मुख्य कार्यालयाच्या माहिती व संमतीनुसारच सुरू होता.

तक्रारदाराच्या ठोस मागण्या– वैद्यकीय आधारावर तात्काळ बदली – परळी शहर शाखा १ किंवा २, संपूर्ण बदली प्रक्रियेचे ऑडिट व स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी, दोषींवर कठोर शिस्तभंग व फौजदारी कारवाई झाली पाहिजे.

**● आडत दुकानासारखी बोली – बदलीचा काळाबाजार**

**तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार – बदलीसाठी १,००,००० (एक लाख रुपये) एजंटमार्फत मागितले गेले. बायपास सर्जरीमुळे आरोग्याच्या कारणाने पैसे देण्याची तयारी असूनही त्या जागेसाठी दुसऱ्या कर्मचाऱ्याने अधिक पैसे दिल्याने बदली नाकारण्यात आली. ज्यांनी जास्त पैसे दिले, त्यांच्या बदल्या तात्काळ ;ज्यांनी पैसे दिले नाहीत, त्यांच्या फाईली वर्षानुवर्षे धूळ खात पडून. हा प्रकार महावितरणसारख्या सार्वजनिक वीज वितरण संस्थेच्या प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा असल्याचे सांगितले जात आहे.**

## १ मार्च रोजी महारक्तदान शिबिराचे आयोजन

**बीड ।** प्रतिनिधी

समाजातील गरजू रुग्णांसाठी रक्ताची वाढती गरज लक्षात घेता दि. १ मार्च २०२६, रविवार रोजी बीड शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी स्वयंस्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन बीड शहरातील विविध सामाजिक, व्यापारी, व्यावसायिक व वैद्यकीय संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे.




या रक्तदान शिबिरात रोटरी क्लब ऑफ बीड (अध्यक्ष – रो. विकास उमापूरकर), रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन (इंजि. रो. राहुल बोरा), रोटरी क्लब ऑफ बीड सिटी (रो. भागवतराव ढाकणे), सातीराम अण्णा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन (श्री अशोक दादा ढोले पाटील), माहेश्वरी प्रगती मंडळ (श्री सुरेंद्र कासट), क्रेडाई संघटना (श्री सुरेंद्र कासट), बीड जिल्हा सी.ए. व टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन (सी. ए. बी. बी. जाधव), स्वराज्य मुद्रा सामाजिक प्रतिष्ठाण (सौ. अनिता ताई भोसले), बीड जिल्हा व्यापारी संघटना (कार्याध्यक्ष – श्री अशोक शेटे), गौतम लब्धी फाउंडेशन (श्री जितेंद्र बोरा), योगा दिपमाळ ग्रुप (श्री जितेंद्र बोरा), बीड शहर व्यापारी संघटना (श्री प्रकाश कानगावकर), इंडियन मेडिकल असोसिएशन – खच– (डॉ. अनंत मुळे), बीड जिल्हा कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअरिंग असोसिएशन (इंजि. श्रीपाद चिंचोलकर), शेतकरी राजा सामाजिक समिती (श्री रोहित धुरंधरे) तसेच वैद्यकीय प्रतिनिधी संघटना, बीड (युनिट सेक्रेटरी – श्री जगन्नाथ निकम) यांचा सहभाग आहे.

सदर रक्तदान शिबिर हे दि.१ मार्च रविवार रोजी सकाळी ९.०० ते दुपारी २ वाजेपर्यंत,श्री. गुरुनानक मंदिर, श्री. स्वामी समर्थ मंदिराजवळ,सहयोग नगर, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे. रक्तदान प्रक्रिया पूर्णतः सुरक्षित व वैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीखाली पार पाडली जाणार आहे.

रक्तदान हे जीवनदान असून एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या रक्तदान शिबिरात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी आवर्जून यावे, असे आवाहन प्रो. चे. रो.अक्षय शेटे मो. नं.८०८७१५८७८७., सी.ए. रो.आदेश नहार (मो. नं.९२७०००८८००) व रो. सचिन लातूरकर ( मो. नं.९४०३६०८१७१) यांनी केले आहे.



*बीड शहरातील राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची 150 वी जयंती साजरी करताना भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी नगर परिषद सभापती श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील ॲड. गोविंद नवनाथ शिराळेपाटील (नगरसेवक नगरपरिषद) बीड. महाराष्ट्र राज्य परीट धोबी समाजसेवा मंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष अँड सुधीर जाधव.) ॲड. राजेंद्र राऊत. (शिवसेनेचे उप शहरप्रमुख गणेश राऊत.जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संजय साळुंके. जिल्हा सचिव प्रवीण साळुंके. जिल्हा उपाध्यक्ष जिजा शिंदे. युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके शहर कार्याध्यक्ष. जयंतीच उत्सव समितीचे सचिव महेंद्र वाघमारे . संतोष भालेकर युवक सचिव अतुल साळुंके. व उपस्थित होते*

# फडणवीस साहेब..! हा तर बुजगावण्याचा कारभार; पोलिसांना आरोपी 'फाटे' कधी सापडणार?

**बीड ।** प्रतिनिधी

फडणवीस साहेब. !संतोष देशमुख हत्याकांड झालं अन् बीड जिल्ह्याचं ग्रहमानच फिरलं. कायदा सुव्यवस्थेची द्वाही देत प्रामाणिक, कर्तव्यदक्षयासारखी बिरुदावली लावलेलं मोठ्ठच्या मोठं बुजगावणं तुम्ही बीडच्या जमिनीत आणून बसवलं. नव्याचे नऊ दिवस म्हणून त्याचं कौतुकही झालं. पण थोड्याच दिवसात नवलाई संपली अन् शेतातल्या बुजगावण्याला जी किंमत असते ती देखील या बुजगावण्याला आज राहिली नाही. बुजगावण्यानच अंगा खांद्यावर पाखर खेळवायला सुरवात केली .

बीड जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे रोज निघताना उघड्या डोळ्याने पहावे लागत आहेत.न्यायासाठी आंदोलन करावी लागत आहेत. रक्षण कर्तेच भक्षण कर्ते झाले आहेत. आरोपींना पाठीशी कसं घालायचं याचा नवा पायंडा बीड जिल्ह्यामध्ये पाडला गेला आहे. खबरदार! न्यायासाठी आंदोलन केलं तर तुम्हालाच आरोपी ठरवून कठड्यात उभा करणार असा नवा अलिखित अध्यादेश बुजगावण्याने काढला आहे. बार्शी नाक्यावर



लहान मुलगा वीज डीपीला चिटकला म्हणून महावितरणच्या दोषी अधिकाऱ्यां विरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी करणारावरच गुन्हे दाखल केले गेले. पतीची हत्या झाली म्हणून न्याय मिळावा यासाठी उपोषण करूनही तो मिळालाच नाही म्हणून महादेव मुंडे च्या पत्नीला पोलीस अधीक्षक कार्यालयात विष प्राशन करून आत्महत्येची वेळ आणली गेली. एवढ्यावरच भागलं नाही तर तिच्यावर देखील गुन्हा दाखल केला गेला. यश ढाका खून प्रकरणात देखील आंदोलन कर्त्यावर गुन्हे दाखल केले गेले. अशा एक ना अनेक घटना बीड जिल्ह्याच्या इतिहासात कधी नव्हे ते घडू लागल्या. ४० दिवसा हून आधी कालावधी उलटून गेलेल्या जीएसटी अधिकारी सचिन जाधवर आत्महत्या प्रकरणातील आरोपी प्रदीप फाटे याला अटक करावी म्हणून त्यांच्या कुटुंबीयाला पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करण्याची वेळ शेवटी आणलीच. जीएसटी अधिकारी जाधवर यांच्या पत्नीला पतीने आत्महत्या केलेली असताना देखील शोक करायला वेळ पोलिसांनी मिळू दिला नाही. जाधवर कुटुंबीयांची ही कैफियत तर होत्या तर नव्हतं आणि नव्हत्याचं होतं करणारे वकील देखील बुजगावण्या कारभारामूळे भरडून निघाले. मंगळवारी दुपारी बाराच्या सुमारास एड. राम डोंगरे यांना राधाकिसन करपे नावाच्या इसमाने महिलांना सोबत घेऊन येत न्यायालयाच्या आवारात मारहाण केली. या प्रकरणात संतप्त झालेल्या वकिलांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. रीतसर तक्रारही दिली. पोलीस अधीक्षकांची देखील भेट घेतली पण दुसऱ्या दिवशी देखील गुन्हा दाखल झाला नाही. वकील संघाने न्यायालयाच्या पायऱ्यावर बसून आंदोलन केलं. न्यायालयाच्या कामकाजात सहभाग घेतला नाही. वकील संघाच्या अध्यक्षांनी तर मारहाण करणारा आरोपी हा दलाल असून त्याचे पोलिसांशी लागेबांधे असल्याचा आरोप केला. महिलाही दलालीतल्याच होत्या तरीदेखील पोलीस आरोपींना पाठीशी घालत आहेत असा आरोप माध्यमांसमोर केला. तरीदेखील पोलीस यंत्रणेला फरक पडला नाही. शेवटी वकिलांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात मोर्चा नेला. नाही हो नाही हो करत घटनेच्या २७ तासानंतर पोलिसांना आरोपी विरोधात गुन्हा दाखल करावा लागला. पण जोपर्यंत आरोपी अटक होणार नाही तोपर्यंत न्यायलयीन कामकाजात सहभाग घेणार नसल्याचं वकील संघाने निर्धार केला आहे.